महाराष्ट्र शासन

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

क्र.एफएलडी-१९२३/प्र.क्र.५३/फ-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ०३ मार्च, २०२३.

प्रति,

अपर मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर

विषय:- वनजमिन-पुणे

**प्रमुख जिल्हा मार्ग क्र. ८५, पेडगांव शिरापूर ते हिंगणीबेर्डी रोड या रस्त्याच्या कामाकरीता मौजे. शिरपूर, ता. दौंड, जि.पुणे येथील ०.०९ हे. राखीव वनजमीन वळती करणेबाबत...**

**संदर्भ:-** केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. कक्ष-१७/ नोडल /पुणे /ID-१३७०३(२५) /३०१८/ २०२२-२३, दि. ०९.०२.२०२३.

संदर्भाधीन दिनांक ०९.०२२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रमुख जिल्हा मार्ग क्र. ८५, पेडगांव शिरापूर ते हिंगणीबेर्डी रोड या रस्त्याच्या कामाकरीता मौजे. शिरपूर, ता. दौंड, जि.पुणे येथील ०.०९ हे. राखीव वनजमीन वळतेकरणाबाबत प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

२. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने खाली नमूद मुद्यांची माहिती आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शासनास तात्काळ उपलब्ध करुन द्यावी.

(१) केंद्रस्थ अधिकारी यांनी प्रस्तावित रस्त्यासाठी मौजे शिरापूर येथील स.नं./गट नं. ३४ येथील आणि प्रस्तावातील इंतर सर्व कागदपत्रामध्ये मौजे शिरापूर येथील स.नं./गट नं. ३५६ येथील जमिन वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेली आहे. सबब, नेमक्या कोणत्या सर्व्हे नंबर / गट नंबर मधील जमिन वळती करण्यासाठी प्रस्तावित केली आहे, याबाबत माहिती सादर करावी.

(२) प्रस्तावामध्ये वृक्षतोड होत नसल्याबाबत नमूद केले आहे. परंतु, KML File चे अवलोकन केले असता, प्रस्तुत प्रकरणी मोठी झाडे तुटणार असल्याचे दिसते. याबाबत, उपवनसंरक्षक यांनी पुनश्च: खात्री करुन, त्याप्रमाणे माहिती सादर करावी.

(३) प्रस्तावित क्षेत्र कोणत्याही संरक्षित क्षेत्र (वन्यजीव अभयारण्य /राष्ट्रीय उद्यान) पासून १० कि.मी. पेक्षा अधिक अंतरावर असल्याचे नमूद केले आहे. परंतु, नकाशाचे अवलोकन केले असता, प्रस्तावित क्षेत्र हे माळढोक पक्षी अभयारण्यापासून ४.८ कि.मी. अंतरावर असल्याचे दिसून येते. सबब, प्रस्तावित क्षेत्र हे माळढोक पक्षी अभयारण्याच्या संवेदनशील क्षेत्राचा (ESZ) भाग आहे किंवा कसे, याबाबत माहिती सादर करावी.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन